# श्री समर्थ सहकारी बँक लि;नाशिक

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**फक्त भागधारकांसाठी**

**बँकेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे केंद्र कार्यालयातील सभागृहात रविवार दि.२६/०९ /२०२१ रोजी सकाळी १0.00 वाजता चेअरमन मा. श्री. नरेंद्र बळवंत कुलकर्णी यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी (Video Conferencing) व्हिसी किंवा (Other Audio Visual Means) इतर दृक श्राव्य माध्यमामार्फत आयोजित करण्याात आली आहे. सदर सभा ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती अपेक्षित नाही. त्यामुळे केंद्र कार्यालय हे सभास्थान मानण्यात येईल. तरी या सभेस ऑनलाईन उपस्थित रहावे, ही विनंती.**

**सभेपुढील विषय**

१. दि. २१/०३/२०२१ रोजी झालेल्या २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२. सन २०२०-२१ चा संचालक मंडळाने तयार केलेला वार्षिक अहवाल वाचून कायम करणे.
३. दि.३१/०३/२०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाची लेखापरिक्षकांनी तपासलेली आर्थिक पत्रके म्हणजे ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजुरी देणे.
४. दि.०१/०४/२०२० ते ३१/०३/२०२१ या कालावधीत एकरकमी कर्ज परतफेड योजनेअंतर्गत बंद झालेल्या थकीत कर्ज खात्यांच्या माहितीची नोंद घेणे तसेच वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेली बुडित खाती निर्लेखित करण्यास मंजुरी देणेबाबत विचार करणे.
५. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मंजुरी देणे.
६. सन २०१९-२० च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
७. वैधानिक लेखापरिक्षकांकडुन आलेल्या सन २०२०-२१ च्या आर्थिक वर्षाच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
८. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२१-२२ च्या वार्षिक आर्थिक अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
९. महाराष्ट्र शासन व रिझर्व्ह बँकेच्या निर्देशाप्रमाणे सन २०२१-२२ च्या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक व अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणुक करणेसाठी रिझर्व्ह बँकेस शिफारस करणे.
१०. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आदेशाप्रमाणे बोर्ड ऑफ मॅनेजमेंटची नियुक्ती बँकेच्या पोटनियमात समाविष्ट करुन तशी पोटनियम दुरुस्ती करणेस मान्यता देणे.
११. बँकेच्या वार्षिक सर्व साधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणेस मान्यता देणे.
१२. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयांचा विचार करणे.

**संचालक मंडळाच्या आदेशावरुन,**

**स्थळ - नाशिक**
**दि. ०९/०९/२०२१**

**भूषण त्र्यंबक रानडे**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

---

**सुचना -**

१. सन २०२०-२१ वर्षाची आर्थिक पत्रके बँकेच्या केंद्र कार्यालयात कामकाजाच्या वेळेत पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.
२. सभासदांच्या मोबाईल क्रमांकावर सर्वसाधारण सभेची लिंक पाठविण्यात येईल.
३. सभासदांना काही सुचना व प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी दि.२० /०९ /२०२१ पुर्वी केंद्र कार्यालयाचे कार्यालयीन कामकाजाचे वेळेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे लेखी कळवावे. सदर सभा ऑनलाईन असल्याने ऐनवेळी कोणतेही प्रश्न विचारात घेतले जाणार नाही.
४. ज्या सभासदांनी मोबाईल क्रमांक किंवा ई-मेल आयडी शेअर्स विभागात नोंदविलेला नसेल त्यांनी बँकेत प्रत्यक्ष येऊन दि. २०.०९.२०२१ पावेतो संपर्क साधावा. जेणेकरुन वार्षिक सभेची Online Link पाठविणे सोईचे हाईल.
५. बँकेच्या सर्व सभासदांना या प्रस्थापित Online Link सभेची पुर्व सुचना निर्धारीत कायद्याच्या अंतर्गत ई-मेल, एस.एम.एस. द्वारा सोईचे व्हावे या करीता बँकेचे सर्व भागधारक सभासदांचे वैयक्तिक विवरण (जसे सभासदांचे नाव, सभासद क्रमांक, मोबाईल नं. ई-मेल आय डी) बँकेजवळ असणे आवश्यक आहे. तेव्हा भागधारक सभासदांना विनंती आहे की या नोटीस प्रकाशन तारखेपासुन दिनांक २०/०९/२०२१ पावेतो आपले उपरोक्त विवरण बँकेच्या shrisamarthbank@rediffmail.com या मेल आयडीवर पाठवावे.